# महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत , पुणे -४११००१

**सन २०२५-२६ करिता जाहिरात**

**प्रधान मंत्री उच्चस्तर शिक्षण प्रोत्साहन योजना (पीएम- युएसपी) अतंर्गत सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी**

उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य, विज्ञान व व्यावसायिक (Vocational) या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रधान मंत्री उच्चस्तर शिक्षण प्रोत्साहन योजनेअंतर्गत सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना उच्च शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे तर्फे राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्रशासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी ७४१७ इतके नवीन मंजूरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी नविन मंजुरीचे आणि नुतनीकरणाचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवरून (एन.एस.पी) मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पध्दतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. नवीन मंजुरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merti List) तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजुर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्याच्या खात्यात ( Under DBT Mode ) जमा करण्यात येते.

सदर योजनेसाठी SSC,CBSE, व ICSE बोर्डचे टॉप २० percentile यादीतील सर्व विद्यार्थी या योजनेचा नवीन मंजुरीसाठी (Fresh) अर्ज करण्यास पात्र असतील. सदर शिष्यवृत्ती करिता उच्च शिक्षण कार्यालयामार्फत केवळ माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, बोर्डचे विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

प्रधान मंत्री उच्चस्तर शिक्षण प्रोत्साहन योजनेअंतर्गत सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना सन २०२५-२६ करीता नवीन शिष्यवृत्ती व नुतनीकरण अर्ज सादर करण्यासाठी केंद्रशासाने घोषित केलेले वेळापत्रक.

| अ.क्र | कार्यसुची | नवीन मंजुरी (Fresh) व नुतनीकरण (Renewal) |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | **३१.१०.२०२५** |

विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी अधिक माहितीसाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळाचे अवलोकन करावे. संकेतस्थळावरील Help line no- ०१२०-६६१९५४० या क्रमांकावर किंवा helpdeshk@nsp.gov.in या ई-मेलवर संपर्क साधावा. तसेच उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे- येथील दुरध्वनी क्र.०२०२९७०७०९८ , ई-मेल-schol.dhepune@gov.in, व वेळोवेळी प्राप्त होणा-या नवीन सुचनांसाठी , www.scholarships.gov.in व www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे अवलोकन करावे.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 17-06-2025 13:55:05

**(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१